**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ९

**सभावृत्तांत**

**दिनांक – १४/०९/२०१८** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षीक सभा **शुक्रवार** दिनांक **१४/०९/२०१८** रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संजय बबन नेवाळे - सभापती**
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
४. मा.सुजाता सुनिल पालांडे
५. मा.गोफणे अनुराधा देविदास
६. मा.अपर्णा निलेश डोके
७. मा.अश्विनी विक्रम वाघमारे

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.राऊत – प्र.सहा.आयुक्त, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) महापौर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा आयोजित करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता घेणेबाबत – मा.अनुराधा गोफणे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) क्रीडांगणाबाबत. – मा.अंबरनाथ कांबळे, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव

विषय क्र.५) महापौर चषक जिल्हास्तर बॉक्सिंग स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेबाबत.- मा.अंबरनाथ कांबळे, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) व्यायामशाळेबाबत.- मा.सुजाता पालांडे, मा.अपर्णा डोके यांचा प्रस्ताव

विषय क्र.७) महापौर चषक राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता घेणेबाबत.- मा.सुजाता पालांडे, मा.अपर्णा डोके यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – ४०

विषय क्रमांक – ०१

दिनांक – १४/०९/२०१८

विभाग - क्रीडा

सुचक – मा.कांबळे अंबरनाथ

अनुमोदक – मा.शैलेश मोरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/३६९/२०१८ दि.०१/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाची संत तुकाराम नगर व्यायामशाळा ही हनुमान स्पोटर्स अँकडमी, चिखली या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेत आलेली असून या व्यायामशाळेची करारनाम्याची मुदत दि.१०/१०/२०१७ ते दि.०९/०९/२०१८ रोजी संपुष्टात येत असल्याने हनुमान स्पोटर्स अँकडमी, चिखली या संस्थेच्या दि.२१/०८/२०१८ च्या पत्रान्वये मनपाचे क्रीडा धोरणानुसार नव्याने ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास आदेशाच्या तारखेपासून पुढील मुदतवाढ देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ४१

विषय क्रमांक – ०२

दिनांक – १४/०९/२०१८

विभाग - क्रीडा

सुचक – मा.अनुराधा गोफणे

अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/३३१/२०१८ दि.०१/०९/२०१८

विषय – मनपाची पोलिस वसाहत व्यायामशाळा, कृष्णानगर, चिखली ही कै.गजानन म्हेत्रे प्रतिष्ठाण, म्हेत्रेवाडी चिखली या संस्थेस ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्या वेळेस करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ४२

विषय क्रमांक – ०३

दिनांक – १४/०९/२०१८

सुचक – मा.अनुराधा गोफणे

अनुमोदक – मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ – मा.अनुराधा गोफणे , मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने,महाराष्ट्र राज्य खो खो असो. पुणे जिल्हा खो खो असो. यांच्या मान्यतेने शिवाजी उदय मंडळ चिंचवड येथे महापौर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा आयोजित करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ४३ विषय क्रमांक – ०४
दिनांक – १४/०९/२०१८
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शैलेश मोरे
संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२० मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल हे जागृती स्पोर्टस सोशल फाऊंडेशन, संत तुकारामनगर यांना पिंपरी चिंचवड मनपाकडून ११ महिन्याच्या सेवाशुल्कावर देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ४४ विषय क्रमांक – ०५
दिनांक – १४/०९/२०१८
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शैलेश मोरे
संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने प्रभाग क्र.२० डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल,संत तुकारामनगर,पिंपरी-१८ येथे महापौर चषक जिल्हास्तर बॉक्सिंग स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ४५ विषय क्रमांक – ०६
दिनांक – १४/०९/२०१८
सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अपर्णा डोके
संदर्भ – मा.सुजाता पालांडे, मा.अपर्णा डोके यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.५ मध्ये सखूबाई गवळी उद्यानातील व्यायामशाळा ही महिलांसाठी आहे ती व्यायामशाळा पुरुष व महिला दोन्ही वर्गांसाठी करणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ४६ विषय क्रमांक – ०७
दिनांक – १४/०९/२०१८
सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अपर्णा डोके
संदर्भ – मा.सुजाता पालांडे, मा.अपर्णा डोके यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने,महाराष्ट्र राज्य हॉलीबॉल असो.पुणे जिल्हा हॉलीबॉल असो.यांच्या मान्यतेने बॅडमिंटन गंगोत्री पार्क भोसरी येथे महापौर चषक राज्यस्तरीय

हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **संजय बबन नेवाळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६०७/२०१८
दिनांक : १७/०९/२०१८



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.